जागतिकीकरण आणि भारतीय अर्थव्यवस्था

डॉ. स्मिता काशिनाथराव मरवाळीकर
लोकप्रशासन विभाग
श्री कुमारस्वामी महाविद्यालय, औसा

प्रस्तावना :

दळणवळणाच्या क्षेत्रामध्ये गेल्या काही दशकात जी क्रांती घडून आली त्यामुळे जागतिकीकरणाच्या प्रक्रियेला मोठी गती मिळाली आहे. जगामध्ये राष्ट्रे खुप असली तरी प्रत्येक राष्ट्राच्या दृष्टीने जागतिकीकरणाचा अर्थ हा वेगळा आहे. विशेषत: भारतासारख्या देशामध्ये जिथे रोज पन्नास रु. अथवा त्यापेक्षाही कमी रुपये मिळविणारे चाळीस कोटी नागरिक राहतात. ज्यांचे आयुष्य द्रारिद्र्यरेषेवरच आहे. जे बेरोजगार किंवा अर्धबेरोजगार आहेत. त्या देशाच्या दृष्टीने जागतिकीकरणाचा अर्थ निश्चितच वेगळा आहे. जागतिकीकरणामुळे प्रत्येक देशात बहुराष्ट्रीय कंपन्यांना मुक्त व्यापाराची संधी मिळणार आहे. जगभरात जेवढया बहुराष्ट्रीय कंपन्या आहेत, त्यांनी आज घडीला संपूर्ण जगात फक्त तीन कोटीच्या आसपास व्यक्तींना रोजगार दिला आहे. या कंपन्यांचा जगभरातील पसारा त्यातून होणारी उलाढाल याचे प्रमाण लक्षात घेता रोजगार निर्मितीचा त्यांचा हा वेग आणि प्रमाण अत्यंत तुटपुंजे आहे. भारतासारख्या बेरोजगारीने ग्रस्त असलेल्या देशात व्यवसाय सुरु करु पाहणाऱ्या प्रत्येक बहुराष्ट्रीय कंपनीला फक्त तिचा धंदा पहायचा असतो. तिला भारतातल्या बेरोजगारीशी व ती दूर करण्याशी काहीही देणे - घेणे नसते. तसेच येथील जनतेची क्रयशक्ती वाढावी, तिच्या श्रमाचे मूल्य वाढावे यात या कंपनीला कोणतेही स्वारस्य नसते.

भारतातील वित्त व्यवस्था विकसित असून निरनिराळया प्रकारच्या बँका, वित्तसंस्था व वित्तीय साधने आहेत. राष्ट्रीय उत्पन्न आणि वित्तीय साधने यांचे परस्परप्रमाण लक्षात घेतले तर विकसनशील पहिल्या पंचवीस टक्क्यांमध्ये येथील वित्तीय क्षेत्राची गणना होते. व्यापारी बँका आणि दीर्घ मुदतीची कर्जे देणाऱ्या संस्था यांच्यामध्ये त्याची विभगणी झाली आहे. येथील भांडवलबाजारही मोठा व विकसित असून गेल्या काही वर्षांत त्यातील गुंतवणूकदारांची संख्याही वाढली आहे. मुंबईच्या शेअर बाजारातील व्यवहार डॉलर्समध्ये मोजल्यास एकुण ३,९०० कोटी डॉलर्सचा असून जगातील शेअर बाजारांत मुंबईतील शेअर बाजाराचा क्रमांक १९ वा होता. गुंतवणुकदारांच्या संख्येचा विचार केला तर त्याचा क्रमांक अमेरिका व जपान यांच्या खालोखाल म्हणजे जगात तिसरा होता. १९८० च्या दशकात शेअर्स आणि रोखे यांची देवाण-घेवाण आणि कंपन्यांची संख्या वाढली इतकेच नव्हे तर गुंतवणूकीसाठी घेतलेल्या भांडवलातही खुप वाढ झाली.

बँकांचे राष्ट्रीयकरण व उद्योजकांच्या संघटना :

इंदिरा गांधीच्या कारकिर्दीत बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले होते. पंचवार्षिक योजनांच्या काळात या क्षेत्रावर अनेक बंधनेही घालण्यात आली होती. बँकींग कायदयानुसार बँकांकडे जमा होणाऱ्या पैशाचा मोठा भाग

(तीस ते पंचवीस टक्के) रिझर्व्ह बँकेच्या आदेशानुसार त्यांना शासकीय रोख्यांत गुंतवावा लागे. त्यावर व्याज बेताचेच मिळे. त्याप्रमाणे शेती, लघुउद्योग आणि निर्यात यांच्या वाढीसाठी त्यांनी कमी दराने कर्जे द्यावीत अशी त्यांच्याकडून अपेक्षा होती. खाजगी कंपन्यांना या क्षेत्रात प्रवेश करण्यास बंदी होती.

१९९१ च्या सुमारास भारतात उद्योजकांच्या तीन संघटना कार्यरत होत्या. 'फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज' ही त्यातील एक प्रमुख संघटना होती. भारतातील स्वातंत्र्य चळवळीला तिने पाठींबा दिला होता. स्वातंत्र्योत्तर काळातील पन्नास वर्षातही औद्योगीक क्षेत्रातील तिचे स्थान टिकून राहिले होते. जवाहरलाल नेहरुंच्या काळात समाजवादाच्या घोषणा देऊन

अर्थव्यवस्थेतील मोक्याच्या जागा ताब्यात घेण्याचे जे धोरण शासनाने अवलंबीले होते ते तिला मान्य नव्हते. म्हणुन सत्ताधारी पक्षापासून ती दूर गेली. 'असोसिएशन ऑफ इंडस्ट्रीज' ही उद्योजकांची दुसरी संघटना होती. काही परकीय कंपन्याही तिच्या सभासद झाल्या होत्या. पण तिला उद्योजकांमध्ये फारसे स्थान नव्हते. कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्रीज ही तिसरी संघटना स्वातंत्र्योत्तर काळात तिचा बराच विकास झाला. बरेच नवे उद्योजक तिचे सभासद होते. १९९१ साली परवाना पध्दत निर्बंध नाहिसे होऊन उद्योजकांना स्वातंत्र्य मिळाले या गोष्टींचे त्यांनी स्वागत केले तर त्यात आश्चर्य नाही.

जागतिकीकरणाचा भारतीय अर्थव्यवस्थेवर झालेला परिणाम :

भारताने आपल्या वित्ती पेठा जगातील इतर पेठांशी जोडण्याचा प्रयत्न गेल्या काही वर्षात सुरु केला आहे. त्यामुळे जगातील इतर देशांत होणाऱ्या घडामोडींचा भारतावर परिणाम होण्याची शक्यता आता खुपच वाढली आहे. १९९७ झाली जेव्हा आग्नेय आशियात संकटाला सुरुवात झाली तेव्हा भारतातील सर्व बाजारपेठांमध्ये शेअर्सचे भाव घसरले. १९८७ साली हे घडले नव्हते. १९९७ साली थयलंडने आपल्या चलनाची किंमत कमी केल्यावर रुपयाची किंमत घसरु त्या वर्षीच्या डिसेंबरमध्ये ती १ डॉलर = ३६.१ रुपयांवरुन ३९ रुपयांपर्यंत घसरली. याचे कारण बँका आणि कंपन्या यांनी चलन बाजारात मोठया प्रमाणावर केलेली सट्टेबाजी होय, असे रिझर्व्ह बँकेचे मत होते. आधीच वाढलेली किंमत परत जागेवर येण्याचा हा भाग आहे, असे रिझर्व्ह बँकेला सुरुवातीला वाटत होते. परंतु रुपया आणखी घसरुन एका डॉलरला ४० हुन जास्त होऊ नये म्हणुन पुढे रिझर्व्ह बँकेला हस्तक्षेप करावा लागला व त्यामधुन २६.६ लक्ष डॉलर्सचे नुकसान सोसावे लागले. रुपयांची किंमत घसरु लागली की परकीय कर्जाचा भार अधिक होतो आणि तेलाच्या व खताच्या किंमतीही वाढतात. त्याचप्रमाणे विजनिर्मीतीसाठी नवी केंद्रे उभारायची झाल्यास आयातीवरील खर्चही वाढतो.

१९९१ सालापुर्वी खेळते भांडवल हे परकीयांची भारतातील गुंतवणुक, शासकीय सहाय्य, व्यापारी कर्जे व परदेशस्य भारतीयांच्या ठेवी या स्वरुपाचे होते. प्रत्यक्ष परकीय गुंतवणुक फार थोडी होती. काही देशांचे फंड येथे नोंदलेले होते. युनिट ट्रस्टने परदेशस्थ भारतीयांसाठी पहिला फंड काढला. त्यानंतर अनेक मॅनेजमेंट कंपन्याही तसेच केले. १९९२ च्या फेब्रुवारीपासून भारतीय कंपन्यांना आपले शेअर्स व कन्व्हर्टिबल बॉण्ड्स युरो मार्केटमध्ये खपवून भांडवल गोळा करण्यास संधी मिळाली. १९९३ - ९४ या वर्षात भारतात गुंतवणुक करणारे ११ फंड काढण्यात आले. त्यामधूक २०७ कोटी डॉलर्स गोळा झाले. त्यामध्ये गुंतवणूक करणारे लोक मुख्यत: इंग्लंड व अमेरिकेतील होते.

परदेशी चलनाच्या बाजारात असणाऱ्या खेळत्या भांडवलांपैकी ८० टक्के भांडवल क्षणार्धात एका देशातून दुसऱ्या देशात जाऊ शकते. भारतातील परदेशी चलणाच्या एकुण साठयाशी असणारे या खेळत्या भांडचलाचे प्रमाण १९९४ साली ३७.५० % आणि मार्च १९९५ साली ५३.५२ % वर जाऊन पोहोचले. भारताकडे असलेल्या परकीय चलनाच्या साठयाहून ही टक्केवारी फारशी कमी नाही. आयातीचा विचार केला तर तो जवळ जवळ सात महिन्यांच्या आयातीइतका आहे.

संदर्भ ग्रंथ :

१. भारतीय अर्थव्यवस्था - श्री रंजन कोळंबे
२. स्पर्धा परीक्षा अर्थशास्त्र - डॉ. किरण जी. देसाई
३. औदयोगिक अर्थशास्त्र - प्रा. रायखेलकर / खेडकर
४. विकासाचे अर्थशास्त्र आणि नियोजन - प्रा. अशोक पत्की

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com